**शासकीय विमान सेसना सायटेशन ५६० एक्सएलएस व्हीटी-व्हिडीडी व शासकीय हेलिकॉप्टर एअरबस एच १४५ व्हीटी जीओव्ही या हवाई वाहनांकरीता विमानचालन व्यवस्थापन सेवेसाठी एजन्सीची नियुक्ती करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्र.विचासं-१११९/प्र.क्र.१७/ २८-अ**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ३२.
दिनांक:- ५ डिसेंबर, २०२३.

**वाचा :**१) मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक १३.०८.२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

२) विमानचालन संचालनालयाचे दिनांक १९/०४/२०२३ चे पत्र

३) सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.विचासं-११२३/ प्र.क्र.३१६/ २८-अ, दि.१९/१०/२०२३ (दि.३/१०/२०२३ च्या शक्ती प्रदत्त बैठकीचे इतिवृत्त)

४) विमानचालन संचालनालयाचे दिनांक ६/११/२०२३ चे पत्र

**प्रस्तावना :**

विमान सेसना सायटेशन ५६० एक्सएलएस व्हीटी-व्हिडीडी व शासकीय हेलिकॉप्टर एअरबस एच १४५ व्हीटी जीओव्ही करीता विमानचालन व्यवस्थापन सेवेसाठी नवीन एजन्सीची नियुक्ती करण्याच्या प्रस्तावास मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक १३.०८.२०१९ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.तसेच यासंदर्भातील नवीन निविदा प्रक्रियेची जबाबदारी महाराष्ट्र विमान विकास कंपनीस देण्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांनी मार्च-२०२३ मध्ये निविदा प्रक्रिया पूर्ण करुन, मे.ॲरो एअर क्राफ्ट सेल्स ॲंड चार्टरस प्रा.लि.,नवी दिल्ली यांची निविदा न्यूनतम असल्याने तसेच त्यांनी निविदेतील अटी व शर्तीनुसार काम करण्याची तयारी दर्शविल्याने त्यांची निविदा स्विकारली. तद्नंतर संचालक, विमानचालन यांनी त्यांचे स्तरावर मे.ॲरो एअर क्राफ्ट सेल्स ॲंड चार्टरस प्रा.लि.,नवी दिल्ली यांचे समवेत दिनांक १/४/२०२३ पासून पुढील तीन वर्षासाठी करारनामा केला. संचालक, विमानचालन संचालनालय,मुंबई यांचेकडून सदर करारनामा संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये शासनास सादर करण्यात आला होता. परंतू सदर करारनामा अंतिम करण्यापूर्वी शासन मान्यता न घेतल्याने त्यास कार्योत्तर मंजूरी घेण्याबाबतचा प्रस्ताव मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक ०३/१०/२०२३ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आला. सदर बैठकीत शक्ती प्रदत्त समितीने विमान सेसना सायटेशन ५६० एक्सएलएस व्हीटी-व्हिडीडी व शासकीय हेलिकॉप्टर एअरबस एच १४५ व्हीटी जीओव्ही या हवाई वाहनाकरीता व्यवस्थापन सेवा पुरविण्याकरीता ॲरो एअरक्राफ्ट सेल्स ॲंड चार्टर्ड प्रा.लि.,नवी दिल्ली यांच्या सोबत संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांनी केलेल्या करारनाम्यास कार्योत्तर मान्यता देण्याचा निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

विमान सेसना सायटेशन ५६० एक्सएलएस व्हीटी-व्हिडीडी व शासकीय हेलिकॉप्टर एअरबस एच १४५ व्हीटी जीओव्ही करीता विमानचालन व्यवस्थापन सेवा (Aviation management Service) पुरविण्याकरीता मे.ॲरो एअरक्राफ्ट सेल्स ॲन्ड चार्टर्ड प्रा.लि.,नवी दिल्ली यांचेसमवेत संचालक, विमानचालन संचालनालय,मुंबई यांनी केलेल्या करारनाम्यास दि.०१.०४.२०२३ ते दि.३१.०३.२०२४ या कालावधीसाठी या शासन निर्णयान्वये कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. सदर करारनाम्यात निश्चित करण्यात आलेल्या दरपत्रकाचे “परिशिष्ट-अ” सोबत जोडले आहे.

२. सदर बाबीसाठी होणारा खर्च मागणी क्र.ए-४, “२०७०-इतर प्रशासकीय सेवा (११४) परिवहन साधनांची खरेदी व परिरक्षण (००) (०२) विमान चालन सल्लागार, महाराष्ट्र शासन (अनिवार्य) २०७० ०१५६” या लेखाशिर्षातंर्गत "५०-इतर खर्च" या उद्दिष्टाखाली संबंधित आर्थिक वर्षात उपलब्ध अर्थसंकल्प तरतूदीतून भागविण्यात यावा, व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. या प्रस्तावासंदर्भात उप संचालक, विमानचालन, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे व संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. सदर शासन आदेश विमानचालन संचालनालयाच्या विविध बाबींवर निर्णय घेण्यासाठी मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक ३/१०/२०२३ रोजी झालेल्या बैठकीत समितीने दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०२३१२०५१६५५३५०८०७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJASHREE S HIRLEKAR

Digitally signed by RAJASHREE S HIRLEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT,
2.5.4.20=a2696592d5d84825b5aed6905fd0b9e9dd2c6726eb5ebc44e78c6af282fc9b0d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9182EA9A54D76E6216129AD842EA023F173D8083DBD47F2CF1041DA3010B16D6, cn=RAJASHREE S HIRLEKAR
Date: 2023.12.05 16:59:10 +05'30'

**( राजश्री हिर्लेकर )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई.
२. उप संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई
४. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
७. सामान्य प्रशासन विभाग / कार्या.२५, मंत्रालय, मुंबई
८. निवड नस्ती

**“परिशिष्ट-अ”**

| अ.क्र. | तपशिल | दर |
|---|---|---|
| १ | मासिक व्यवस्थापन सेवा VT-VDD व VT-GOV | ३,५१,०००/- प्रती महा + देय कर |
| २ | VT-VDD वैमानिक | ४१,४९,०००/-प्रती महा + देयक कर |
| ३ | VT-VDD कॅबीन क्रु (हवाई सुंदरी) | १५,०००/- प्रती दिवस + देय कर |
| ४ | VT-VDD व VT-GOV पायलटसाठी वैद्यकीय तपासणी अधिकारी | ९०,०००/- प्रती महा + देय कर |
| ५ | वैमानिक प्रशिक्षक (VT-VDD + VT-GOV) | २,००,०००/- प्रती परीक्षा + देय कर |
| ६ | वैमानिक (VT-VDD + VT-GOV) | १,२५,०००/- प्रती परीक्षा + देय कर |
| ७ | सहवैमानीक (VT-VDD + VT-GOV) | ५०,०००/- प्रती परीक्षा + देय कर |
| ८ | मुख्य सुरक्षा अधिकारी/कार्यचालन अधिकारी | १,२५,०१०/- प्रती परीक्षा + देय कर |
| ९ | जबाबदार व्यवस्थापक (Accountable Manager) ) | ३,५०,०००/- प्रती महा + देय कर |
| १० | Qm-Quality-Manager<br>CAM Continuous Airwarthy Manager | ६५,०१०/- प्रती महा + देय कर |
| ११ | सहायक भंडार अधिकारी | ५१,५००/- प्रती महा + देय कर |
| १२ | मल्टी टास्कीं स्टाफ | ४१,८५०/- प्रती महा + देय कर |